Anti Corruption Bureau Aurangabad (Unit)

दिनांक ०९/०३/२०२३

## प्रसिध्दी पत्रक

आरोपी खाजगी इसम अब्दुल अजीज खान अब्दुल कादीर खान, वय 48 वर्षे, व्यवसाय चालक, रा.घर नं 201, म्हस्के गल्ली पडेगांव, ता.जि.औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रक्कम 20000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आरोपी खाजगी इसम यांचे नाव व पत्ता | :- | अब्दुल अजीज खान अब्दुल कादीर खान, वय 48 वर्षे, व्यवसाय चालक, रा.घर नं 201, म्हस्के गल्ली पडेगांव, ता.जि.औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 20000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 20000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती रेश्मा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या प्लॉटची तलाठी कार्यालयात तलाठी यांना सदर खरेदीची फेरफार नोंदी घेऊन कागदपत्र देण्यासाठी सांगुन काम करुन देता म्हणुन |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांनी मौजे मिटमिटा शिवारातील गट नं 158 मध्ये खरेदी केलेल्या प्लॉट क्र 96, 97 चे तलाठी कार्यालयातुन फेरफार होण्यासाठी अर्ज केला होता. सदर अर्जाप्रमाणे फेरफार नोंद घेण्यासाठी यातील आरोपी अब्दुल अजीज खान अब्दुल कदीर खान यांनी तक्रारदार यास सांगीतले की, माझी तलाठी यांच्याशी ओळख आहे, तुम्ही दिलेल्या अर्जावर फेरफारची नोंद होऊन कागदपत्र मिळण्याकरीता तलाठी यांना सांगुन काम करुन देतो त्याकरीता अब्दुल अजीज हे तक्रारदार यांच्याकडे 20000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आरोपी खाजगी इसम अब्दुल अजीम यांनी तक्रारदार यांच्याकडे 20000/- रुपयाची लाचेची मागणी पंच साक्षीदारांसमक्ष केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि.09/03/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आरोपी खाजगी इसम अब्दुल अजीम खान अब्दुल कदीर खान यांनी लाचेची रक्कम 20000/-रुपये पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून पोलीस कॉलनी पडेगांव औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आरोपी खाजगी इसम अब्दुल अजीम खान अब्दुल कदीर खान यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे छावणी औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदिप राजपुत यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार केवलसिंग गुसिंगे, रविंद्र काळे, चालक पो.अ. सी. एन. बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

9/3/23

(मारुती शंकर पंडित)

पोलीस उप अधिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

औरंगाबाद.